# भारतातील राजकारण, अर्थकारण आणि कल्याणकारी राज्य

डॉ. अस्लम दस्तगीर अत्तार
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
पेठवडगाव, जि.कोल्हापूर
Email: adattar24@gmail.com

**गोषवारा:**

लोकशाहीमध्ये लोकांचे कल्याण ही संकल्पना मतपेटीतून जात असते. लोकशाहीमध्ये लोकांच्या कल्याणाचा मार्ग निवडणुकीमार्गे जात असतो. महागाई, जातीय संघर्ष, इतर सामाजिक व आर्थिक स्थितंतरे इ. बद्दलची आपली मते मतपेटीतून व्यक्त होत असतात. एकीकडे लोकांच्या नवीन सरकारकडून अपेक्षा वाढत जात असताना त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महसुली तुट, अंदाजपत्रकीय तुट याकडे दुर्लक्ष करावे लागते. कल्याणकारी राज्य या संकल्पनेनुसार सरकारकडून मदत करताना दोन माध्यमातून मदत केली पाहिजे. एक म्हणजे थेट हस्तांतर दुसरे संस्थात्मक मार्गाने थेट अनुदान देणे. कल्याणकारी राज्य ही संकल्पना स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क यांसारख्या प्रगत राष्ट्रातून आलेली दिसते. भारतात कल्याणकारी राज्य कल्पनेत अनेक योजना आहेत. उदा. अन्नसुरक्षा, ग्रामीण आवास, जननी सुरक्षा योजना, मनरेगा, जन-धन योजना इ. अनेक सामाजिक सुधारणा व त्यांची अंमलबजावणी याकरीता सरकारवर पुष्कळवेळी मतपेटीचा दबाव असतो. पण सरकारमध्ये पुरेसे संख्याबळ असेल तर मतपेटीचा दबाव कमी असतो. बहुजन, वंचित, शोषित घटकांना शिक्षण, आरोग्य, जगण्याचे हक्क जाणीवपूर्वक बाजूला सारल्याचे चित्र आपणास स्पष्ट दिसले नाही तर नवलच. मतपेटयातून आलेला निकाल यातून त्या सरकारकडे तज्ञ नसतील तर स्वायत्त संस्थाची स्थिती फारच गंभीर होते. उदा. रिझर्व बँकेची केलेली अवस्था, पंचवार्षिक योजना बंद करणे. स्वायत्त संस्था याकडे सरकारने खूपच गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कारण याची स्वायतत्ता नाहीशी झाली तर याचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम घडून येतो. व या परिस्थितीतून बाहेर पडणे कठीण बनते. लोकशाहीमध्ये असो अगर कोणत्याही देशाचे सरकार बनत असताना लोकांनी विचार करून सरकार निवडले पाहीजे. धर्म, भावना या गोष्टी बाजूला सारून सरकार बनवायला हवे.

**सूचक शब्द :** कल्याणकारी राज्य (Welfare State), लोकशाही, स्वायत संस्था, सरकार

**प्रस्तावना :**

ॲडम स्मिथ यांच्या मते, खाजगी उपक्रमाना प्रोत्साहन देऊन समाजाचे जास्तीत जास्त हित साध्य करण्यासाठी सरकारने नियंत्रकाची भूमिका पार पाडावी.

सरकारने संरक्षण अंतर्गत कायदा व सुव्यवस्था व प्रशासन व न्यायदान या कार्याबरोबर जनहिताची कामे केली पाहिजेत. राज्य हे पोलीसी राज्य न राहता कल्याणकारी राज्य झाले पाहिजे. राजकीय पक्षांची मानसिकता सत्तेवर आल्यानंतर सरकारचा खजिना रीकामा करणे व प्रसंगी ज्या मतांच्या जीवावर सत्तेत आले त्या लोकांसाठी हळूहळू योजना राबवायला सुरुवात करतात. व यातून मोठा दबाव त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडतो. राजकीय पक्षांचे धोरणामुळे लोकशाहीमध्ये मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. यातून सरकार आर्थिक दिवाळखोरीत अडकण्याची शक्यता

निर्माण होते. कल्याणकारी भूमिका व अर्थव्यवस्था या दोन्ही बाजू प्रत्येक राजकीय पक्षाने तपासल्या पाहिजेत. त्या देशाच्या आर्थिक व सामाजिक विकास कसा राखावा हे राजकीय पक्षांनी आत्मसात केले पाहिजे. जनतेला मोफत वीज, थेट खात्यात रोख रक्कम अनुदान, कर्जमाफी यासारखी आश्वासने दयायची व सत्तेत यायचे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर बोजा टाकायचा यातून सार्वजनिक कर्ज वाढत जाऊन तो देश कर्जाच्या सापळ्यात अडकून त्या देशाची स्थिती श्रीलंका देशासारखी झाल्याशिवाय राहणार नाही.

**कल्याणकारी राज्य संकल्पना :**

स्थूलमानाने देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत कल्याणाची म्हणजे योगक्षेमाची जबाबदारी स्वीकारून, त्यानुसार आपली शासकीय धोरणे व कार्य ठरवणारी राज्यसंस्था. कल्याणकारी राज्य व्यक्तीला न्याय हक्कापासून आणि स्वातंत्र्यापासून वंचित न करता, वर्गीय संघर्ष टाळून सामाजिक आणि आर्थिक बदलांनी सामाजिक कल्याण साधण्याचे उद्दिष्ट ठेवते. कल्याणकारी राज्य मक्तेदारीला विरोध करून संपत्तीच्या केंद्रीकरणाचा धोका टाळते. भांडवल व मनुष्यबळ यांचा जास्तीत-जास्त आणि परस्परपूरक वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहते. नफ्याची योग्यवाटणी,जबाबदारी आणि संधी यांचा समतोल राखून सामाजिक सुरेक्षेचे वातावरण तयार करते. कल्याणकारी राज्यात नियोजनाला महत्वपूर्ण स्थान असते.

**व्याख्या :**

1) G. D. H. Cole : "The welfare state is a society in which an assured minimum standard of living and opportunity becomes the possession of every citizen."

2) प्रो. लास्की : "कल्याणकारी राज्य लोगों का वह संघटन है जिसमें कि सबका सामूहिक रूप से हित हो सके"

**उद्दिष्टे:**

1) भारतातील लोक कल्याणकारी योजनांचा आढावा घेणे.

2) भारतातील लोक कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे.

3) भारतातील सरकार व त्याची धोरणे याचा आढावा घेणे.

**गृहितके :**

1) बहुजन, वंचित, शोषित घटकाकडे सरकारने विशेष लक्ष द्यायला पाहिजे पण भारतात दुर्लक्ष केले आहे.

2) भारतात सर्वसमावेशक विकास (Inclusive Growth) मधील अडथळे खूप आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन पेपर हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून त्याकरीता CME Report, Census 2011, कंज्यूमर कॉन्फीडन्स इंडेक्स, उपभोग व्यय सर्वेक्षण 2017-18, UNDP Report 2021, विविध लेख, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ. चा वापर करण्यात आला आहे. हा संशोधन पेपर “भारतातील राजकारण, अर्थकारण व कल्याणकारी राज्य” यावरती आधारीत आहे.

**भारतातील कल्याणकारी योजना:**

भारताने स्वातंत्र्यानंतर मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली .मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारची भूमिका निर्णायक स्वरूपाची असते .मिश्र अर्थव्यवस्थेत सरकारची भूमिका सार्वजनिक क्षेत्रांचा विकास करणे संयुक्त व खाजगी विकासाला चालना देणे विकास कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून देणे ,देशाच्या आर्थिक व्यवहारात विधायक भूमिका बजावणे ,राष्ट्रातील आर्थिक विषमतेची दरी कमी करणे, काम करणाऱ्या सक्षम लोकांना काम उपलब्ध करून देणे इत्यादीसाठी सरकारची भूमिका महत्त्वाची ठरते. समाजातील सर्वांना नियोजनाचा लाभ प्राप्त करून देण्यासाठी सरकारला महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडावी लागते. राष्ट्रातील विविध क्षेत्रांचा विकास करताना योजनांचा लाभ गरिबांना अधिक मिळवून देण्याचे कार्य करावे लागते. आर्थिक नियोजनाची गरज वंचित वर्गाच्या राहणीमानात झालेल्या सुधारणा यातून स्पष्ट होते. सामाजिक वस्तू व सेवासाठी पसंती सिध्दांत अँथनी डाऊन्स यांनी मांडला. बहुमताने कोणती वस्तु व सेवा पुरवावी याकरिता मतदान घ्यावे .बहुमताच्या आधारे त्या वस्तू व सेवा पुरवाव्या. अँथनी डाउन्स यांच्या मते ,यांच्या मते राजकीय पक्ष समाजातील उत्पादन साधनांचे कार्यक्षम वाटप करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्या मते निवडून दिलेले राजकीय पक्ष व प्रतिनिधी स्वार्थाने प्रेरित झालेला असतात ते आदर्श सामाजिक धोरणे साध्य करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. म्हणजेच उत्तम सामाजिक कल्याणासाठी ते प्रयत्नशील नसतात. मतदानातील टक्केवारी कमी राहणे ही लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक आहे .महागाई ,इंधन ,किंमती दरवाढ ,बेरोजगारी , धार्मिक बाबी ,आर्थिक व सामाजिक स्थितरे हे मुद्दे घेऊन निवडणुका जिंकायच्या व नंतर दिलेली आश्वासने विसरून जायचे .ही वस्तुस्थिती भारतात दिसून येते .भारतात सध्या 75 विविध प्रकरच्या लोक कल्याणकारी योजना आढळतात.

1) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना 2,25,000 कोटी हस्तांतर

2) जन धन योजना 34.26 कोटी खाती उघडली त्यामध्ये 90,000 कोटी पेक्षा अधिक पैसे जमा आहेत.

3) मुद्रा योजना 16 कोटी वाटप

4) अटल पेन्शन योजना 3.32 कोटी

5) प्रधानमंत्री सुरक्षा विमा 24.57 कोटी व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा 10.81 कोटी लाभधारक 04 ऑक्टोबर 2021 पर्यंत

6) बेटी बचाओ- बेटी पढाओ (सुकन्या समृद्धी स्कीम)

7) उज्ज्वला योजना 3.46 कोटी घरेलू गैस कनेक्शन वितरीत केले आहेत.

9) आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत 04 ऑक्टोबर 2021 पर्यंत 2.18 कोटी अधिक लोकांनी लाभ घेतला.

10) गरीब कल्याण अन्न योजना 3.40 लाख कोटी 80 कोटी लोकांना धान्य

11) जल जीवन मिशन 8.27 कोटी ग्रामीण घरांना नळपाणी पुरवठा लाभ

RBI आकडेवारीनुसार अन्न, इंधन, खते, सबसिडी याकरीता सध्याच्या सरकारने 2014-22 या दरम्यान 91 लाख कोटी खर्च केले. तर मागच्या सरकारने 2004-14 या काळात 49.2 लाख कोटी खर्च केले.

**सध्याचे भारतीय राजकारण, अर्थकारण:**

सध्याचे भारतीय राजकारण, अर्थकारण समजून घेताना अनेक बाबीवर प्रकाशझोत टाकायला हवा.

1) **जीडीपी आणि HDI** :

भारताचा वृद्धीदर 2019 मध्ये 6.55% होता, तर 2021 मध्ये 6.6% होता तर 2022 ला तो 9.2% इतका सध्या करायचा होता. एकीकडे भारताचा जीडीपी मधील वृद्धीदर बाकीच्या देशाच्या मानाने अत्यंत चांगला आहे. मात्र HDI (Human Development Index) 189 देशातील स्थान मात्र 131 ते 129 या दरम्यान राहते. HDI मूल्य वाढविणे हे मोठे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आहे. त्यासाठी शिक्षण, आरोग्य, उत्पन्न या विशेष बाबीवर लक्ष द्यायला हवे. शिक्षणातील गळती रोखायला हवी, श्रमसहभाजन दर वाढवायला हवातसेच लिंग असमानता यावर भारताने काम केले पाहिजे. जेणेकरून HDI मधील मुल्य वाढेल. मात्र देश धार्मिक, राजकीय बाबीत गुंतला आहे.

2) **गरीबी:**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार भारतात 2020 मध्ये 4 कोटी ६० लाख नागरीक गरीबीच्या खाईत लोटले आहेत. जगभरातल्या गरीबामधील 50% गरीब भारतात आहेत. उपभोग व्यय सर्वेक्षण 2017-18 नुसार गेल्या 8 वर्षात 1.52 कोटी गरिबांची संख्या वाढली आहे. HDI मूल्य कमी असायला दारिद्र्य एकमेव कारण आहे. याकरीता विविध योजना अंमलबजावणी केली पाहिजे.

3) **आर्थिक विषमता**:

जागतिक विषमता अहवालात भारताचा उल्लेख गरीब व असमानता असलेला देश असे केले आहे. भारतात वरच्या आर्थिक स्तरातील 10% लोकांकडे राष्ट्रीय उत्पनाच्या 57.1% भाग जातो. तर खालच्या वर्गातील तब्बल निम्या लोकसंख्येकडे केवळ 13% भाग जातो. सर्वात श्रीमंत अशा अवघ्या

1% वर्गाकडे देशाच्या एकूण उत्पनाच्या 22% भाग जातो. याच काळात भारतात अब्जाधीशांची संख्या 2020 मध्ये 102 वरून 142 झाली. भारतात आर्थिक विषमता मोठया प्रमाणात वाढत आहे. व यातून गरीब व श्रीमंत यामधील दरी वाढतच आहे.

**4) बेरोजगारी :**

अर्थतज्ञ कौशिक बसू यांच्या मते, मागील तीन दशकांच्या तुलनेत देशात बेरोजगार दर सर्वाधिक आहे. बेरोजगारांची संख्या २०१४ मध्ये १४ कोटी होती. ती २०१८ मध्ये ३० कोटी तर डिसेंबर २०२१ पर्यन्त 5.3 कोटी बेरोजगार लोकसंख्या होती. भारतातील बेरोजगारीचा मुद्दा चिंताजनक आहे. मेक इन इंडीया सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून उत्पादन, रोजगार फायदा मिळू शकलेला नाही.

**5) खाजगीकरण व भांडवलदार लोकांचा फायदा :**

जेव्हा निवडक धनिकासाठी सत्ता राबवली जाते, सत्ताधीश अशा धनिकांचे गुलाम बनतात तेव्हां ते सरकारची मालमत्ता कवडी मोलाने या धनिकाच्या पदरात नेऊन देतात. जिथे देशातील 90% संपत्ती ही मूठभर श्रीमंताच्या हातात एकवटलेली असते. असे विचार प्रसिद्ध विचारवंत नोम चौम्स्की मांडले. भारताची वाटचाल याच दिशेने सुरु आहे ही बाब विचार करायला लावणारी आहे. तेल, वायू, बंदरे, विमानतळे, उर्जा अशा जवळपास 100 मालमत्तांचे खाजगीकरण यातून 1.3 ट्रिलियन पैसा उभारला जाईल. केंद्र सरकारने 26 सार्वजनिक शेत्रातील कंपन्याचे खाजगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये Air India, BPCL, BCPL, HNL,HFL या कंपन्याचा समावेश आहे. यातून गरीब, वंचित घटकांना त्या वस्तू घेणे परवडणार नाही.

**6) ग्राहकाचा खर्च :**

भारतात कंज्यूमर कॉन्फीडन्स इंडेक्सनुसार ग्राहकाचा खर्च करण्याचा आत्मविश्वास 50% पेक्षा कमी झाला आहे. कमी मिळकत आणि वाढती महागाई यामुळे लोक खर्च करीत नाहीत. ज्याचा वाईट परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होतो.

**7) स्वायत्त संस्थाची स्थिती:**

स्वायत्त संस्थाची लोकशाहीमध्ये विशेषतः लोककल्याणकारी राज्यामध्ये महत्त्वाची भूमिका असते. सध्याच्या सरकारने स्वायत संस्थाची स्वायतत्ता काढून घेतली आहे. ज्या कारणासाठी ह्या संस्था स्थापन झाल्या त्याचा उद्देशच नाहीसा झाला आहे. Reserve Bank of India मध्ये एकही गव्हर्नर आपला कार्यकाळ पूर्ण होई पर्यंत थांबला नाही. याचाच दुसरा अर्थ असा काढता येईल की स्वायत संस्थामध्ये सरकारचा हस्तक्षेप वाढला आहे. नियोजन आयोग बंद करणे, नीती आयोग स्थापना यामुळे वंचित, शोषित घटकांचा मिळणारा हक्काचा निधी बंद झाला आहे. मतदानाच्या पेटीतून ह्या सर्व घटकांना न्याय मिळावा ही अपेक्षा असताना निराशा होणे. हे लोकशाहीप्रधान देशाला भूषणावाह नक्कीच नाही.

**8) राजकीय कुरघोडी व यंत्रणांचा वापर:**

सध्या भारतात प्रगल्भ राजकारण दिसत नाही. अनेक मुद्दे घेऊन संसदेत चर्चा साकारल्या जाव्या व यातून सकारात्मक विकासाचे मुद्दे मांडले जाऊन प्रगत देशाची निर्मिती व्हावी असे असताना याउलट चित्र सध्या दिसत असून संसदेचा वेळ वाया जाऊन करदात्यांचा हेतू सफल झालेला दिसत नाही. ईडी व इतर तपास यंत्रणाचा वापर राजकीय कुरघोडी साठी वापर सध्या होत आहे. ही बाब देशाच्या विकासाच्या दृष्टीने फारच गंभीर आहे.

**9) इंधन किंमती:**

उज्वला योजना गरीब कुटुंबातील महिलांना गैस वितरण केले होते. मात्र आजचे दर 1000 रुपये आहेत. पेट्रोल, डिझेल किंमती 120 पार करून गेल्या आहेत. यामुळे सर्व सामान्य लोकांच्या जगण्याचे हाल सध्या होत आहेत. पण भारतीय लोकप्रतिनिधी हनुमान चालीसा व मशिदी भोंगे यावर काम करीत आहेत. ही लोक कल्याणकारी राज्याची गुणवैशिष्ट्ये मुळीच नाहीत.

**10) नोटाबंदी व जीएसटी :**

नोटाबंदी नंतर 99.3% नोटा Reserve Bank of India कडे परत आल्या. नोटाबंदी हा सरकारचा निर्णय चुकला होता. याउलट याच काळात राष्ट्रीय उत्पन्न 2% नी घसरले. अंदाजे 3 लाख ते 3.5 लाख कोटींचे नुकसान होत. नोटाबंदी हा सरकारचा निर्णय पूर्वतयारी शिवाय घेतलेला होता. यातून साध्य काहीच झाले नाही. याउलट नवीन नोटांच्या छपाईसाठी 21,000 कोटी रुपये खर्च झाले. त्याचे अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम झाले. जीएसटी निर्णय देखील पुर्वीच्या सरकारने घेतला असला तरी त्याची योग्य अमंलबजावणी झालेली नाही.

**11) कोरोना महामारी:**

कोरोना महामारी स्थिती सरकारला हाताळायला आलेली नाही. यात सर्वसामान्य जनता यांना खूप त्रास सहन करावा लागला. थाळी वाजवून, मेणबत्ती लावून कोरोना गेलेला नाही. उलट परिस्थिती खूपच गंभीर बनली होती. कोरोना महामारी स्थिती असताना उत्तराखंड मध्ये कुंभमेळा साठी सरकारने परवानगी देलेली होती. ज्यामध्ये 35 लाख लोक सामील झालेली होते. पण दुसरीकडे निजामुद्दीन मर्कज, दिल्ली यात वेगळा न्याय दिलेला होता. यातून सरकारची 'धर्मनिरपेक्षता' दिसून येते. ही बाब धर्मनिरपेक्ष देश म्हणून लोकांच्या पचनी पडलेली नाही.

**12) पीएम केयर फंड:**

पीएम केयर फंड पूर्णपणे वापरायला हवा पण तसे झाले नाही. कोरोना महामारीत सरकारने धान्य दिले पण रोजगार गेल्याने बिकट परिस्थिती झालेली होती. या काळात गरीब लोकांना अनुदान, बेकारभत्ते द्यायला हवे होते पण तसे झाले नाही. पीएम केयर फंड याकरीता वापरायला हवा होता.

**निष्कर्ष:**

सरकारने करदात्यांचा पैसा समाजामध्ये विकासाकरीता वापरायला हवा पण सध्याचे सरकार असा प्रयोग करताना दिसत नाही. हा पैसा पुतळ्यांसाठी वापरला जातो. ही बाब खूपच गंभीर आहे. 200 कोटी रक्कम सरकारने सरदार पटेल पुतळ्याकरीता दिले तर त्याच्या जाहिरातीसाठी 2.64 कोटी खर्च करते. एकीकडे गरीब महिलासाठी उज्ज्वला गॅस योजना करीता कनेक्शन दिले पण दुसरीकडे याची सबसिडी बंद केली. शिक्षण, आरोग्य स्थिती फारच गंभीर केली आहे. शिक्षण, आरोग्यावरील, पायाभूत सोई-सुविधा खर्च वाढविला पाहिजे. पण सरकार त्यामध्ये कपात करीत असताना दिसत आहे, ही बाब खूपच गंभीर आहे. स्वायत्त संस्था मधील सरकारचा हस्तक्षेप हा थांबला पाहिजे. राजकीय कुरघोडीसाठी ईडी व इतर तपास यंत्रणाचा वापर करताना सरकार दिसत आहे. यातून सरकार विरोधी वातावरण तयार होत नाही. यामुळे सर्व सामान्य जनतेचे हक्क दाबले जाण्याची शक्यता जास्त असते. एकीकडे भारताचा जीडीपी मधील वृद्धीदर बाकीच्या देशाच्या मानाने अत्यंत चांगला आहे. मात्र HDI (Human Development Index) Rank 181 देशामधील स्थान मात्र 131 ते 129 या दरम्यान आहे. HDI मूल्य वाढविणे हे मोठे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आहे. त्यासाठी शिक्षण, आरोग्य, उत्पन्न या बाबीवर विशेष लक्ष द्यायला हवे. शिक्षणातील गळती रोखायला हवी, उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करायला हवे. गरीबी दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. पण देशातील सरकार मात्र धार्मिक, राजकीय बाबतीत गुंतला आहे. सरदार पटेल पुतळा, राम मंदीर, अनेक कल्याणकारी योजना बंद, स्वायत्त संस्था मधील सरकारचा हस्तक्षेप, न्यायव्यवस्था डळमळीत करणे इ. गोष्टी सरकारकडून होत आहेत. तर दुसरीकडे इंधन दरवाढ, महागाई, बेकरी, शिक्षण, आरोग्य इ. बाबीकडे सोईस्कर दुर्लक्ष केले जात आहे.

**संदर्भ:**

1) CME Report
2) Census 2011
3) Goldman , Peter , The Welfare State, London, 1964
4) कंज्यूमर कॉन्फीडन्स इंडेक्स
5) उपभोग व्यय सर्वेक्षण 2017-18
6) UNDP Report 2021
7) www.pmindia.gov.in/mr/news_updates/%E0%A4%96%E0%A4%BE%E0%
8) wwww.bbc.com/Marathi/india_46128639.amp